## ''प्रेस नोट''          दि. १०/०३/२०२६.

**शिवडी पोलीस ठाणेतील दाखल गुन्हयात ए.टी.एम. व्दारे फसवणुक करणा-या परराज्यातील आरोपींचा शोध घेवुन अटक केलेबाबत....**

हे दिनांक २४/१२/२०२५ रोजी सायंकाळी ०५:०० वाच्या सुमारास फिर्यादी आलम लियाकतअली खान, वय ४६ वर्षे, उडपी हॉटेलच्या बाजुला, दारूखाना, शिवडी, मुंबई येथील ॲक्सिस बॅकेच्या ए.टी.एम मधुन पैसे काढत असताना त्यांचे ए.टी.एम कार्ड हे ए.टी.एम मशिनच्या स्लॉटमध्ये अडकले, त्यामुळे फिर्यादी यांनी नमुद ए.टी.एम मध्ये लावलेल्या हेल्पलाईन मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला असता हेल्पलाईन क्रमांकावरून बोलणा-या व्यक्तीने फिर्यादी यांचे अडकलेले ए.टी.एम कार्ड काढुन देण्यासाठी एक कर्मचारी मसिना हॉस्पीटल, भायखला, मुंबई येथे असुन त्याठिकाणी जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादी मसिना हॉस्पिटल येथे गेले असता वाट पाहुनही कोणीही कर्मचारी न आल्याने त्यांनी हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क केला असता कर्मचारी उपलब्ध नसल्याचे सांगितले. त्यामुळे फिर्यादी यांनी दुस-या दिवशी त्यांचे कार्ड ब्लॉक करून नवीन ए.टी.एम कार्ड घेतले तेव्हा त्यांना समजले की, स्लॉटमध्ये अडकलेल्या त्यांच्या ए.टी.एम कार्डच्या सहाय्याने कोणीतरी अज्ञात इसमाने एकुण ८ ट्रान्जेक्शनच्या माध्यमातुन एकुण ८९,७९७/-रू ची फसवणुक केल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून शिवडी पोलीस ठाणे गु.र.क्र ५४/२०२६ कलम ३१८(४) भा.न्या.सं सह कलम ६६ (क) ६६ (ड) माहिती व तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने घटनास्थळ व परिसरात केलेल्या तपासात गुन्हयात एकुण ०४ आरोपी निष्पन्न झाले. तसेच आरोपींनी फिर्यादीच्या ए.टी.एम कार्डच्या सहाय्याने रोख रक्कम तसेच भायखळा येथील दुकानातुन ट्रॅव्हल बॅग्ज, शुज, ड्रायफ्रुटस् असे साहित्य खरेदी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. गुन्हयाचे अधिक तपासात तांत्रिक विश्लेषण व विश्वसनीय बातमीदार यांच्या आधारे एकुण ०३ आरोपींना गया, राज्य बिहार व सराईकेला, राज्य झारखंड येथुन अटक करण्यात आली आहे. **आरोपींची माहीती खालीलप्रमाणे :-**

१)अनंत कुमार नागेश्वर महातो, वय २७ वर्ष, रा.ठी गाव बडगाव, तहसिल फतेपुर, थाना फतेहपुर, जिल्हा गया, बिहार,
२) अजित कुमार प्रमोद सिंग वय २७ वर्ष, रा.ठी. गाव बडगाव, तहसिल फतेपुर, थाना फतेहपुर, जिल्हा गया, बिहार.
३) गोपाल कुमार दिनेश सिंग, वय ३२ वर्ष, काम-ॲटो ड्रायव्हर, पत्ता:- घर नंबर , चित्रगुप्त नगर, गमरीया, थाना अदीत्यपुर, जिल्हा सराईकिला, झारखंड.

गुन्हयातील वर नमुद आरोपींचा इतर गुन्हयातील सहभाग तसेच पाहीजे आरोपी याबाबत तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. सत्यनारायण चौधरी, पोलीस सह आयुक्त, (का.व सु.), श्री. अभिनव देशमुख सो, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई., श्री. विजयकांत सागर सो, पोलीस उप आयुक्त बंदर परिमंडळ मुंबई., श्री. विश्वनाथ कोळेकर सो, सहाय्यक पोलीस आयुक्त वडाळा विभाग, मुंबई., श्री. रोहित खोत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवडी पोलीस ठाणे, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अनिल देवळे पोलीस निरीक्षक (गुन्हे),स.पो.नि सागर काळेकर, पो.उ.नि.राहुल शिंदे (सायबर अधिकारी), पो.ह.क्र. ९७०७५२/कदम,पो.ह.क्र.०७१५१७/साळेकर, पो.ह.क्र ०३०९४९/ वाडीले, पो.शि.क्र.०९०३५२/ शेख, पो.शि.क्र. ०९३३८०/जमादार, पो.शि.क्र ०९०३५२/ शेख, पो. शि. क्र.१४०१८७ / घाडगे यांनी पार पाडलेली आहे.